वसा सक्षम मातृत्वाचा
MOM-able™
फर्टिलिटी अँड टेस्ट ट्यूब बेबी सेंटर
सोमवार ते शनिवार सकाळी १० ते ४
आता मुंबई, पुणे, नाशिक या शहरात जाण्याची गरज नाही
IVF
ट्रिटमेंटने घ्या मातृत्वाचा आनंद आपल्या संगमनेरमध्ये
आजच आपली अपॉईंटमेंट बुक करा
8080 215 215
9699 327 301
दुसरा मजला, संजीवन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर नाशिक-पुणे रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव

| | |
|---|---|
| 22 कॅरेट हॉलमार्क दागिणे | = 1, 38, 420/- |
| 20 कॅरेट मणी | = 1, 25, 845/- |
| 18 कॅरेट रोज गोल्ड | = 1, 13, 250/- |
| 16 कॅरेट मुरणी | = 1, 00, 670/- |

बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ९२ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) गुरूवार । १६/०४/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# दत्तधामच्या भोंदूविषयी जनतेच्या मनात राग पण पोलीसांना कारवाईसाठी येईना जाग

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिकच्या अशोक खरात प्रकरणाने संपर्क महाराष्ट्र हादरला असताना आणि त्यानंतर अनेक बोगस महाराज, बोगस बाबांचे एक एक प्रकरण बाहेर येत असताना देखील तथाकथित बाबांच्या भक्तांची संख्या कमी होताना दिसत नाही. असेच एका बोगस भोंदू बाबाचे एक एक कारनामे आणि कलाकारी बाहेर येत असून अनेकांची श्रद्धेच्या नावाखाली फसवणूक होत आहे. मात्र या बाबाच्या दहशतीमुळे कोणीही तक्रार करण्यासाठी पुढे येत नसल्याने त्याचे फावत आहे. त्यामुळे एकीकडे त्यांच्याविरुद्ध जनतेत राग वाढत असून सर्व माहिती असताना देखील पोलीस दखल घेत नाही की त्यांना जाग येत नाही किंवा त्यांनी झोपेचे सोंग घेतले आहे असा सवाल अंधश्रद्धा निर्मूलन समितीसह सर्व सामान्य नागरिकांना पडला आहे.




वडगाव पान, ता. संगमनेर येथील दत्तधामच्या भोंदूबाबाचा चेहरा उघड करण्यासाठी एलएस मराठी या वृत्तवाहिनीने केलेली मुलाखत जनतेच्या व शासनाच्या डोळ्यात अंजन घालणारी आहे. फोटोत दिसत असलेली प्रचंड गर्दीमधील व्यक्ती त्यांच्या समस्या दुर होतील या भावनेने येतात. असे असले तरी भोंदू बाबाच्या ओम शिव म्हणण्याने कॅन्सर बरा न होता आर्थिक लुबाडणूक होत असल्याची भावना काही नागरीकांनी वृत्तवाहिनीच्या व्हिडीओत व्यक्त केली आहे.

**एलएस मराठीचे पत्रकार अमोल मतकर यांनी दत्तधाममध्ये पिडीत नागरीकांशी तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या पदाधिकारी ॲड. रंजना गवांदे यांच्याशी केलेल्या संवादाची चित्रफित एलएस मराठीच्या सहकार्याने देत आहोत.**

**वडगावपान येथे प्रत्येक गुरुवार व रविवारी या गडगे बाबाच्या दरबार भरतो. आजूबाजूच्या जिल्ह्यास परराज्यातून येथे नागरिक येतात. प्रत्येकाकडून एन्ट्री फी च्या नावाखाली भरमसाठ पैसे उकळले जाते. मात्र अनेकांना या बाबाचा कुठलाही फायदा होत नाही. स्थानिक नागरिकांना देखील फायदा होत नाही. त्यामुळे बाबाने पुर्वी सारखे गवंडी काम करावे व लोकांची फसवणूक टाळावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.**

बदलत्या जीवनशैलीमुळे अनेक नवीन प्रश्न देखील निर्माण झाले आहे. ताण - तणाव, शारीरिक व्याधी, व्यसन, वाढत्या इच्छा अपेक्षा यामुळे अनेकांच्या जीवनात वेगवेगळे प्रश्न निर्माण झाले आहे. योग्य मार्गदर्शन व योग्य उपचार याद्वारे यातील काही प्रश्न सुटू शकतात परंतु अनेकदा अनेकांना हे प्रश्न दैवी प्रश्न असून ते बुवा बाबांच्या आश्रमात आणि त्यांच्यामुळेच सुटू शकतात असे वाटते. त्यामुळे अति धार्मिक लोक खरात आणि गडगे बाबांच्या आहारी जातात.

दरम्यान खरात फाईल ओपन झाल्यानंतर संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथील तथाकथित दत्तधाम नावाने आश्रम चालविणाऱ्या गडगे बाबाच्या एक एका कलाकारीचे नमुने पुढे येऊ लागले आहेत. वडगाव पान येथे या बाबाने अलिशान असे सभामंडपाचा आश्रम उभारला आहे. त्याचबरोबर आजूबाजूला त्याने त्याचेच किंवा त्याच्या चेल्यांचे हॉटेल, मेडीकल उभारले आहे. पिचलेले, संकटग्रस्त लोक तेथे आले असता त्यांच्याकडून काही हजार रुपये एन्ट्री फी घेतली जाते. आणि थातुरमातुर औषध त्यांच्याच मेडिकल मधून घेण्यास भाग पाडले जाते. अशा प्रकारची दुहेरी तिहेरी लूट सुरू असते. तर या बाबाचेच कार्यकर्ते चक्क तीन ते पाच हजार रुपये घेऊन लवकर नंबर लावून देतात. याचाच अर्थ येथे केवळ पैशांचा, श्रध्देचा बाजार मांडला जात आहे. असे दिसते.

वास्तविक माणसांच्या शरीरात अनेक प्रकारचे आजार दडलेले असतात. त्यातला एक गंभीर आजार म्हणजे कॅन्सर. या कॅन्सरच्या निर्मूलनासाठी अनेक शास्त्रज्ञांनी अथक परिश्रमाने औषधोपचार शोधून काढले, अजूनही त्यात रात्रंदिवस संशोधन सुरू आहे. असे असताना दत्तधामचा भोंदू गडगे बाबा ओम शीव.... म्हणून नागरीकांचे कॅन्सर बरे करीत असल्याचे दावे करीत आहेत. (पान ६ वर)

# संगमनेरनंतर पारनेरमध्येही तमाशा कलावंतांना मारहाण

युवावार्ता (प्रतिनिधी)

पारनेर - काही दिवसांपूर्वी संगमनेर तालुक्यातील एका गावात मद्यधुंद तरुणांनी किरकोळ कारणावरून गावात आलेल्या तमाशा कलावंतांना मारहाण केली. त्यानंतर आता पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथे बनाईदेवी यात्रोत्सवाच्या आनंदाला गालबोट लावणारी निंदनीय घटना घडली आहे. यात्रोत्सवानिमित्त आयोजित तमाशा कार्यक्रमादरम्यान काही मद्यधुंद तरुणांनी तमाशा कलावंतांवर जीवघेणा हल्ला चढवला. या हल्ल्यात केवळ पुरुष कलाकारच नव्हे, तर महिला कलाकारांनाही मारहाण करण्यात आली असून त्यांच्या अस्मितेला धक्का लावण्याचा प्रयत्न झाला आहे. या घटनेची गंभीर दखल घेत राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी गुन्हेगारांवर कठोर कारवाईचे आदेश दिले आहे. मात्र या घटनेमुळे राज्यातील तमाशा कलावंत भयभीत झाले असून आम्हाला संरक्षण द्या अशी मागणी करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

दि. १२ एप्रिल रोजी यात्रेनिमित्त दिपाली आनंदा भोसले यांच्या तमाशा मंडळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रात्री दहाच्या सुमारास कार्यक्रम सुरू होण्यापूर्वीच रविंद्र शिंदे, अमोल शिंदे आणि बाळू बर्डे या प्रमुख संशयितांसह इतर ४ ते ५ जण मद्यधुंद अवस्थेत स्टेजजवळ आले. त्यांनी कार्यक्रम कधी सुरू होणार यावरून सुरुवातीला वाद घातला आणि त्यानंतर अचानक सात-आठ जणांच्या टोळयाने कलावंतांना शिवीगाळ करत धक्काबुक्की सुरू केली.

हा वाद एवढ्या थराला गेला की हल्लेखोरांनी कलावंतांना लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी आलेल्या गणेश अष्टीकर भोसले यांच्यावर लोखंडी खुट्याने वार करून त्यांना जखमी करण्यात आले. या टोळयाने महिला कलाकारांचे कपडे फाडून असभ्य वर्तन केले. केवळ शारीरिक इजा करूनच हे हल्लेखोर थांबले नाहीत, तर त्यांनी तमाशातील ऑर्गन, ढोलकी, माईक, मिसर आणि साऊंड सिस्टिम यासारख्या वाद्यांची आणि साहित्याची तोडफोड केली. या तोडफोडीत कलावंतांचे सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच गावकरी आणि पोलिसांनी धाव घेतली, मात्र तोपर्यंत हल्लेखोर पसार झाले होते. या भयंकर प्रकारामुळे कलावंतांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले असून अखेर तो कार्यक्रम रद्द करण्यात आला. या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

# खरातच्या संपर्कात अनेक मंत्री, आमदार - दमानिया

मुंबई (वृत्तसंस्था)

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी भोंदू अशोक खरात प्रकरणात अनेक दिग्गज राजकारण्यांच्या नावांचा जाहीर खुलासा करत राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली असून, यात एकनाथ शिंदे, सुनील तटकरे, जयंत पाटील आणि दीपक केसरकर यांच्यासह विशेषतः रूपाली चाकणकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले आहे. दमानिया यांनी सादर केलेल्या पुराव्यानुसार, खरातच्या कॉल लिस्टमध्ये रूपाली चाकणकर या सर्वात वरच्या स्थानी असून त्यांनी खरातला तब्बल १७७ वेळा कॉल केला आणि त्यांच्यात ३३ हजार ७२७ सेकंदांचे संभाषण झाले असल्याची माहिती दमानिया यांनी दिली.

अंजली दमानिया म्हणाल्या, भोंदू अशोक खरातकडे जाणारे अनेक राजकारणी होते. त्यातले काही राजकारणी एकाने सांगितले म्हणून गेले असतील. पण काही काही राजकारणी संधीसाधूपणा करायला आणि काही साध्य करायला नक्कीच गेले असतील. त्यामुळे मी जेवढे राजकारणी सापडले आहेत, ती यादी नुसती वाचून दाखवणार आहे. याचा अर्थ माझा त्यांच्यावर काही आक्षेप आहे असे नाही किंवा ते विकृत गोष्टीत सहभागी होते असेही म्हणता येत नाही. पण राजकारणी तिथे गेले हे मला नमूद करायचे आहे. पुढे बोलताना अंजली दमानिया यांनी राजकारणी लोकांचे तसेच त्यांच्याशी संबंधित लोकांचे नाव सांगितले. त्यात, नाशिकचे आमदार नितीन पवार, चंद्रकांत पाटील, चंद्रकांत पाटील यांचे पीए मंगेश देशपांडे, उदय सांगळे जे सिन्नरमधून उभे होते पण ते हरले ते सुद्धा गेले होते. आमदार शिवाजी शहाणे, पद्मश्री पोपटराव पवार, रामदास खेडकर जे दादा भुसे यांचे पीए आहेत, दीपक केसरकर ज्यांचा नंबर सापडला होता व त्यांचे १९ कॉल होते.

# 'कैसे हराया' फेम नगरसेविकेचे जात प्रमाणपत्र अवैध, पद धोक्यात



मुंबई (वृत्तसंस्था)

ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा येथील एमआयएमची नगरसेविका सहर शेखचे जात प्रमाणपत्र अवैध असल्याचा अहवाल ठाणे तहसीलदार उमेश पाटील यांनी दिला आहे. त्यामुळे आता सहर शेख हिचे नगरसेवकपद जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. नगरसेवक झाल्यानंतर केलेल्या भाषणावेळी सहर हिने कैसे हराया.. असे भाषणात म्हणाली अन् महाराष्ट्रात प्रसिद्ध झाली होती. सहरचे रील अन् व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. पण आता सहर शेख हिचे नगरसेवकपद जाण्याची शक्यता आहे.

सहर शेख आणि वडील युनुस शेख यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची करण्यात यावा अशी शिफारसही करण्यात आली आहे. तहसीलदार उमेश पाटील यांनी गुन्हा दाखल करण्याची शिफारस केली. उपविभागीय जिल्हाधिकारी ठाणे आणि कोकण विभाग जातपतडताळणी समितीकडे शिफारस केली. सहरचे वडील यांचे जात प्रमाणपत्र अवैध असल्याची करण्यात तक्रार केली होती. सहर हिच्याविरोधात सिद्दीकी अहमद या व्यक्तीने तक्रार केली होती. त्यावर चौकशी करण्यात आली. त्यात सहर दोषी असल्याचे आढळले आहे.ठाणे तहसीलदार उमेश पाटील यांनी चौकशी केली. त्यानंतर अहवाल तयार केला. सहर शेख मुळची उत्तर प्रदेश राज्यातील गाझियाबाद येथील रहिवाशी आहे. जातपडताळणी विभाग, निवडणूक विभाग आणि ठाणे उपविभागीय जिल्हाधिकारी कार्यालय यांची फसवणूक केल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. सहर हिच्यावर आता गुन्हा दाखल होणार आहे. त्याशिवाय तिचे नगरसेवकपदही जाऊ शकते. सहर शेख ही मुळची राष्ट्रवादी काँग्रेसची कार्यकर्ता होती. राष्ट्रवादीत बंड करून एमआयएम मधून ती नगरसेविका बनली होती. तीच्या विजयाने आमदार जितेंद्र आव्हाड यांना देखील मोठा फटका बसला होता.

ओममयूर® ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
सुवर्णस्पर्शने होईल
प्रत्येक क्षण समृद्धीचा...
अक्षय तृतीया आणि लग्नसराईसाठी खास ऑफर
दागिन्यांच्या मजुरीवर
20 ते 60 % सूट
पर्यंत भरघोस सूट!
ऑफर कालावधी: १ एप्रिल ते १८ मे २०२६
नियम व अटी लागू
सोने । चांदी । हिरे । अशोक चौक, संगमनेर. मो : 937201 2044

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त
ऑफर मिळतेय जबरदस्त !
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
अक्षयतृतीया पर्यंत १० gm २२ कॅरेट सोने बुकिंग फक्त २००० हजार मध्ये
संगमनेर मार्केटमध्ये..
२२ कॅरेट सोन्याचा दर..
३००० रुपयांपेक्षा कमी !
हो हो..३००० रुपयांनी दर कमी
म्हणून आजच भेट द्या...
ऑफर फक्त 20/4/2026 पर्यंत
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/70661 49090

## राजकीय नेत्यांना फडणवीसांचे आवाहन

# महिला आरक्षणाला पाठिंबा द्या

मुंबई (वृत्तसंस्था)

महिला आरक्षण विधेयकाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभा आणि राज्यसभेतील महाराष्ट्रातील सर्व खासदारांना पत्र पाठवून या विधेयकाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. विशेष म्हणजे हे पत्र केवळ खासदारांनाच नव्हे तर विविध पक्षांच्या प्रदेशाध्यक्षांनाही पाठवण्यात आले आहे. त्यामुळे या विषयावर सर्वपक्षीय एकमत निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट झाले आहे.



या पत्रांमध्ये उद्धव ठाकरे, हर्षवर्धन सपकाळ, शशिकांत शिंदे आणि सुनील तटकरे यांच्यासह विविध राजकीय नेत्यांचा समावेश आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या पत्रातून महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा द्या आणि या ऐतिहासिक निर्णयाचे साक्षीदार व्हा, असे आवाहन केले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी ही पत्रे संबंधित नेत्यांना पाठवण्यात आली आहेत.

दरम्यान, केंद्र सरकारने महिला आरक्षण विधेयक लवकरात लवकर लागू करण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. १६ ते १८ एप्रिल दरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले असून, त्यामध्ये या विधेयकावर चर्चा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील सर्व पक्षांनी एकमताने हे विधेयक मंजूर करावे, असे आवाहन केले आहे. त्यामुळे या अधिवेशनाकडे देशभराचे लक्ष लागले आहे.

महिला आरक्षणाशी संबंधित नारी शक्ती वंदन कायदा २०२३ मध्ये मंजूर झाला होता. आता त्यामध्ये काही सुधारणा करून तो २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी लागू करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या नव्या विधेयकात लोकसभेच्या जागांची संख्या वाढवण्याची तरतूद करण्यात आली आहे. प्रस्तावानुसार, लोकसभेच्या एकूण जागा ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्यात येणार असून, त्यापैकी ८१५ जागा राज्यांसाठी आणि ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी असतील.

# 1 मेपासून रिक्षा-टॅक्सीचालकांना मराठी सक्ती

## असा निर्णय घेणारे महाराष्ट्र देशातील तिसरे राज्य

मुंबई (वृत्तसंस्था)

आगामी १ मे महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे अनिवार्य करण्यात येणार आहे. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून संबंधित चालकांना मराठी लिहिता व वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे. मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील, असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.



प्रताप सरनाईक म्हणाले की, मोटार परिवहन विभागामार्फत रिक्षा किंवा टॅक्सी चालकांना परवाना देताना स्थानिक भाषेचे, म्हणजेच मराठी भाषेचे ज्ञान असणे हा नियम आधीपासूनच लागू आहे. मात्र, मुंबई महानगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये अनेक परवानाधारक चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येत नाही, तसेच काही चालक मराठी बोलण्यास टाळाटाळ करतात, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत.

ज्या प्रदेशात आपण राहतो त्या प्रदेशाची भाषा व्यवसायासाठी शिकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपल्या मातृभाषेचा अभिमान असणे जितके आवश्यक आहे, तितकेच इतर राज्यात व्यवसाय करताना त्या राज्याच्या भाषेचा आदर करणेही महत्त्वाचे आहे.

म्हणूनच १ मेपासून सर्व परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा लिहिता व वाचता येणे बंधनकारक राहील. नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील. तसेच नियमांकडे दुर्लक्ष करून चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या परिवहन अधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

# संयुक्त राष्ट्रसंघात भारताचा दबदबा

## तीन जागतिक समित्यांमध्ये भारताची निवड

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

२ एप्रिल २०२६ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या इकोनॉमिक अँड सोशल कॉन्सिल कॉनशील अंतर्गत विविध महत्त्वाच्या संस्थांमध्ये भारताची निवड करण्यात आली. न्यूयॉर्क येथील संयुक्त राष्ट्र मुख्यालयात पार पडलेल्या या प्रक्रियेत भारताला २०२७ ते २०३० या कालावधीसाठी महत्त्वपूर्ण समित्यांमध्ये स्थान मिळालं आहे.

भारताची गुन्हेगारी प्रतिबंध आणि फौजदारी न्याय आयोग - Commission on Crime Prevention and Criminal Justice (CCPCJ), यूएन महिला - UN Women च्या कार्यकारी मंडळात तसेच कार्यक्रम आणि समन्वय समिती - Committee for Programme and Coordination (CPC) मध्ये निवड झाली आहे. या संस्था गुन्हेगारी प्रतिबंध, महिला सक्षमीकरण आणि जागतिक कार्यक्रमांचे नियोजन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर काम करतात. या निवडीमुळे भारताला जागतिक धोरणनिर्मितीत अधिक सक्रिय भूमिका निभावण्याची संधी मिळणार आहे. गुन्हेगारी नियंत्रण, सामाजिक विकास, लैंगिक समानता आणि आर्थिक सहकार्य या क्षेत्रांमध्ये भारताचा आवाज अधिक प्रभावीपणे मांडला जाणार आहे.

गेल्या काही वर्षांत Digital India, Beti Bachao Beti Padhao आणि Jan Dhan Yojana यांसारख्या उपक्रमांमुळे भारताने जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळेच या संस्थांमध्ये भारताची निवड ही केवळ राजनैतिक यश नसून, देशाच्या विकास मॉडेलला मिळालेली जागतिक मान्यता मानली जात आहे.

या निवडीसोबत काही जबाबदाऱ्या आणि आव्हानेही आहेत. उउझउग मध्ये भारताला सायबर क्राइम, मानव तस्करी यांसारख्या गंभीर मुद्द्यांवर ठोस भूमिका मांडावी लागेल. तर णछ थाशप मध्ये महिला सक्षमीकरणाच्या जागतिक धोरणांमध्ये प्रभावी योगदान देणं आवश्यक असेल. एकूणच, एउजडजउ अंतर्गत भारताची ही निवड देशाच्या वाढत्या जागतिक प्रभावाची साक्ष देणारी आहे. आता या संधीचा उपयोग करून भारताने केवळ स्वतःच्या हितांसाठी नव्हे, तर जागतिक स्तरावर समतोल आणि न्याय्य विकासासाठी योगदान देणं हीच खरी कसोटी ठरणार आहे.

# महाराष्ट्रात पाईप गॅसची सुविधा घरोघरी पोहोचवण्यासाठी राज्य शासनाचे प्रयत्न जोरात

मुंबई (वृत्तसंस्था) आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे उद्भवलेल्या ऊर्जा संकटाचा सामना करण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. इस्त्रायल-इराण संघर्षाचा जागतिक पुरवठा साखळीवर मोठा परिणाम झाला असून, परिणामी द्रवीभूत पेट्रोलियम गॅसच्या (एलपीजी) उपलब्धतेवर मर्यादा आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, पर्यायी व्यवस्था म्हणून राज्यात 'सिटी गॅस डिस्ट्रिब्युशन' (सीजीडी) नेटवर्कचा विस्तार अधिक वेगाने करण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी पाईप गॅस (पीएनजी) घराघरांत पोहोचवण्यासाठी नवीन मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

या मोहिमेला गती देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात सीजीडी कंपन्यांना 'जिल्हास्तरीय समन्वय अधिकारी' (नोडल अधिकारी) नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हे अधिकारी गॅस पाईपलाईनच्या कामाचा साप्ताहिक प्रगती अहवाल 'ए ते जी' या विहित नमुन्यात राज्यस्तरीय समन्वयकांना सादर करतील. गॅस पाईपलाईनची लांबी आणि जोडणीची टक्केवारी याचा सविस्तर तपशील दर सोमवारी दुपारी १ वाजेपर्यंत सरकारला सादर करणे आता बंधनकारक असेल. नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार, नोंदणीकृत तसेच प्रस्तावित गृहनिर्माण संस्थांकडून (हाऊसिंग सोसायट्या) पीएनजी जोडणीसाठी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. वैयक्तिक इमारतींमधील रहिवासी सामूहिक किंवा वैयक्तिक स्वरूपात अर्ज करू शकतील. नागरिकांच्या सुविधेसाठी ऑनलाइन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतींनी अर्ज स्वीकारण्याच्या सूचना कंपन्यांना देण्यात आल्या आहेत.

# निळवंडे धरणातून बुधवारपासून दोन्ही कालव्यातून पाणी

## शेतकऱ्यांचे आंदोलन मागे



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुक्यातील निळवंडे धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्यातून उर्वरित २०० दलघफू पाणी बुधवार (दि. १५ एप्रिल) पासून सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तालुक्याचे लोकप्रतिनिधी, जलसंपदा विभागाचे अधिकारी आणि शेतकरी यांच्यात मंगळवारी झालेल्या बैठकीत हा तोडगा निघाला. प्रमुख मागण्या मान्य झाल्याने शेतकऱ्यांनी पुकारलेले बेमुदत आंदोलन दुसऱ्या दिवशी मागे घेतले आहे.

पाण्याच्या मागणीसाठी शेतकरी व कार्यकर्त्यांनी सोमवारी रात्रीपासून अकोले-धामणगाव रोडवरील घोलप वस्तीनजीकच्या कालव्यातच ठिय्या मांडला होता. रात्रभर टाळ, मृदंग आणि भजनाच्या साथीने हे आंदोलन सुरू होते. याची दखल घेत जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासनाला तात्काळ कार्यवाहीच्या सूचना दिल्या. त्यानंतर जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता गणेश हारदे, उपअभियंता युवराज खडके व कवडे यांनी अकोले येथे धाव घेत आंदोलकांशी सकारात्मक चर्चा केली.

या बैठकीत शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचण्यासाठी उपचाऱ्यांचे (पाईप टाकण्याचे) काम तात्काळ सुरू करण्याचे मान्य करण्यात आले. तसेच

निम्नस्तरीय मोठ्या कालव्यांच्या अस्तरीकरणास (काँक्रिटीकरण) ज्या शेतकऱ्यांचा विरोध आहे, तेथील कामे तूर्त थांबवून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली निर्णय घेण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले. या समाधानकारक तोडग्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी आमदार डॉ. किरण लहामटे, माकपचे प्रदेश सचिव डॉ. अजित नवले, शिवसेना नेते बाळासाहेब भोर, अगस्ती कारखान्याचे संचालक पर्वतराव

नाईकवाडी, बाजार समिती सभापती भानुदास तिकांडे, अमृतसागर दूध संघाचे संचालक आप्पासाहेब आवारी, उपजिल्हाप्रमुख महेश नवले, तालुकाप्रमुख मच्छिंद्र धुमाळ, प्राचार्य शांताराम गजे, गणेश पापळ, अण्णा शेटे, अशोक देशमुख, किरण गजे, वसंतराव धुमाळ, पूजा आवारी आदींसह कालवा लाभक्षेत्रातील सरपंच व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रतापपूर येथे गायरान जमिनीवर अतिक्रमण, ग्रामस्थाचे उपोषण

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - संगमनेर तालुक्यातील प्रतापपूर येथे शासकीय गायरान जमिनीवर ग्रामपंचायत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे संतापलेल्या धोंडीराम गंगाराम आंधळे यांनी मंगळवारी (दि. १४) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे. या आंदोलनामुळे स्थानिक महसूल विभाग आणि ग्रामपंचायत वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

प्रत्तापपूर येथे शासकीय गायरान जमीन असून ती सार्वजनिक वापरासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. या जागेवर गावातील एका व्यक्तीने अधिकृतपणे अतिक्रमण केल्याचा आरोप आंधळे यांनी केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे ग्रामपंचायतीने संबंधित व्यक्तीला घरकुल मंजूर करताना रेकॉर्डवर २५ बाय २५ ची जागा दर्शविली होती, मात्र प्रत्यक्षात त्याठिकाणी ३५ बाय ३५ चे बांधकाम करून मोठ्या प्रमाणावर आले अतिक्रमण करण्यात असल्याचा गंभीर आरोप देखील आंधळे यांनी केला आहे.

या अतिक्रमणाबाबत ग्रामपंचायत प्रशासनाने मागील वर्षी संबंधितांना नोटिसा बजावल्या होत्या, परंतु या नोटिसा केवळ कागदोपत्रीच राहिल्या असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. २०१० आणि २०११ च्या शासन प्ररिपत्रकानुसार गायरान जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याचे स्पष्ट आदेश असतानाही, प्रतापपू: ग्रामपंचायतीने या नियमांचे सरका उल्लंघन केल्याचे म्हणत आंधळे यांनी ग्रामपंचायत पदाधिकारी आणि प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. दरम्यान, धोंडीराम आंधळे यांनी मंगळवारी सकाळी ११:३० वाजेपासून उपोषणास सुरुवात केली. त्यांनी या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री सचिवालय, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि गटविकास अधिकारी यांना पाठवल्या आहेत.

## नाशिक एसआयटीची धडक

### जळगावातील शिक्षण विभागात खळबळ

जळगाव (वृत्तसंस्था)

जळगाव जिल्ह्यातील शालार्थ घोटाळ्यात ४८ शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना नाशिक एसआयटीतर्फे सुनावणीसाठी नोटीस पाठवण्यात आली आहे. जळगावच्या माध्यमिक शिक्षण विभागातील आजी-माजी शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह तब्बल ४८ जणांना नोटीस पाठवण्यात आली आहे. २०२५ मध्ये नाशिकच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने जळगावात येऊन दहा शाळांच्या मुख्याध्यापक व संस्थाचालकांची चौकशी करीत महत्त्वाची कागदपत्रे ताब्यात घेतली आहे. जळगाव जिल्ह्यातील काही शाळांनी कोणतीही पडताळणी न करता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती केल्याचे तपासात समोर आले आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे ६०० हून अधिक शिक्षकांचे बनावट आयडी तयार करून कोट्यवधींचा पगार लाटल्याचे उघड झाले आहे. ११ उपशिक्षणाधिकारी, ३ कक्षाधिकारी तसेच वरिष्ठ व कनिष्ठ सहायक अशा एकूण ४८ जणांची चौकशी केली जाणार आहे. १५ ते १८ एप्रिल दरम्यान नाशिक विभागीय मंडळात हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जळगावमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे ६०० हून अधिक शिक्षकांचे बनावट आयडी तयार करून कोट्यवधींचा पगार लाटल्याचे प्रकरण उघड झालेले आहे. या तपासात माध्यमिक शिक्षण आजी-माजी शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह तब्बल ४८ जणांना एसआयटीतर्फे सुनावणीसाठी नोटीस बजाविण्यात आली आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त संगमनेरमध्ये ॲम्बुलन्स सेवा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संतपरंपरेचा समृद्ध वारसा सांगणारी राज्यघटना देशाला दिली. राज्यघटना व लोकशाही ही आपल्या देशाचा आत्मा असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समतेचा विचार हा जगाला मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन मा.महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले असून राष्ट्रीय दलित पँथर आणि राजू खरात मित्र मंडळ यांच्या वतीने ॲम्बुलन्स सेवेचे लोकार्पण केले.



संगमनेर हायटेक बस स्थानक येथे राष्ट्रीय दलित पँथरच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, राष्ट्रीय दलित पँथरचे राजू खरात, विश्वासराव मुर्तडक, सिताराम राऊत, प्रवीण गायकवाड, रवी गिरी, ऋतिक राऊत, जीवन पांचारिया यांच्यासह विविध मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय दलित पँथर व राजूभाऊ खरात मित्र मंडळाच्या वतीने म्बुलन्स सेवेचे लोकार्पण करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना मा.मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली देशाला स्वातंत्र्य मिळाले तर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला समितीची राज्यघटना दिली. आंतरराष्ट्रीय पातळीवर या दोन व्यक्तिमत्त्वांचा मोठा आदर्श असून इतिहासकार अर्थतज्ञ समाज तज्ञ असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण पूर्ण केले. गरीब शोषितांच्या साठी लढा दिला. त्यांनी दिलेली राज्यघटना ही अत्यंत महत्त्वाची असून राज्यघटना आणि लोकशाही जपण्याची जबाबदारी सर्व युवकांची आहे. या राष्ट्रपुरुषांची विचार सर्वांनी आचरणात आणले पाहिजे असे आव्हान त्यांनी केले.

तर आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली या हायटेक बसस्थानकासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ त्यांचा पूर्णकृती पुतळा उभारला जाणार आहे.

तर डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, राजूभाऊ खरात मित्र मंडळाने गोरगरिबांच्या सेवा करता दिलेली म्बुलन्स सेवेमुळे गरीब नागरिकांना वैद्यकीय सेवा तात्काळ मिळण्यासाठी मोठी मदत होणार आहे. तर राजू खरात म्हणाले की लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यात गोरगरीब माणसांच्या विकासासाठी काम केले जात आहे. काही लोक भुलथापा देतील मात्र कोणीही या भूलथापांना बळी न पडता सर्वांनी सर्वांना सोबत पुढे घेऊन जाणारे लोक नेतृत्व थोरात यांच्याच पाठीशी उभे राहिले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण गायकवाड यांनी केले तर रवी गिरी यांनी आभार मानले. यावेळी दलित पँथरच्या विविध कार्यकर्त्यांनी अत्यंत आनंदात व मोठ्या उत्साहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी केली.

# भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात ईडीची एन्ट्री



## दोन गोण्या कागदपत्रांतून मोठे रॅकेट उघड

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक- भोंदूबाबा अशोक खरात याच्याविरोधात गुन्ह्यांची मालिका सुरूच असून मंगळवारी त्याच्या पोलिस कोठडीत चौथ्यांदा वाढ झालेली असतानाच आता या बहुचर्चित प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाची (ईडी) एन्ट्री झाली आहे. 'ईडी' च्या विशेष १३ सदस्यीय पथकाने खरातचे नाशिकमधील निवासस्थान, सिन्नर (मिरगाव) येथील कार्यालये आणि पुण्यातील त्याच्या सीएच्या (सनदी लेखापाल) ठिकाणांवर सोमवार व मंगळवार असे दोन दिवस छापे टाकले आहेत. या कारवाईत दोन गोण्या भरून महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली असून यात अनेक बड्या सरकारी अधिकाऱ्यांचे 'कनेक्शन' उघडकीस आले आहे. या अधिकाऱ्यांची ईडी स्वतंत्र चौकशी करणार असून त्यांना नोटिसा बजावण्यात येणार आहेत.

खरातच्या नाशकातील कर्मयोगीनगरमधील 'तृप्तबाला' या बंगल्यात तब्बल १५ तासांच्या झडतीत जप्त केलेल्या दोन गोण्या कागदपत्रांची सध्या पथकाकडून कसून तपासणी सुरू आहे. प्राथमिक माहितीतून या कागदपत्रांमध्ये नाशिकसह पाथर्डी आणि गौळाणे शिवार परिसरातील मोक्याच्या भूखंडांच्या खरेदी-विक्रीचे आणि मालकीचे दस्तऐवज सापडले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे खरातशी संबंधित अनेक मालमत्ता आणि भूखंड हे काही बड्या शासकीय अधिकाऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावे असल्याचे समोर आले आहे. काळ्या पैशांची गुंतवणूक करण्यासाठी या अधिकाऱ्यांनी खरातच्या माध्यमातून नातेवाइकांच्या नावे जमिनी घेतल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. यात केवळ नाशिकच नव्हे, तर पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील अनेक मोक्याच्या जागांचाही समावेश असल्याचे स्पष्ट झाले आहे.

जप्त केलेल्या कागदपत्रांमध्ये ज्या शासकीय अधिकाऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांची नावे निष्पन्न झाली आहेत, त्यांची संपूर्ण माहिती ईडीने संकलित केली आहे. आता थेट या संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनाच ईडीकडून लवकरच स्वतंत्र नोटिसा बजावण्यात येणार आहेत. त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत आणि या जमिनींच्या खरेदीतील आर्थिक व्यवहार याबाबत ईडीकडून त्यांची सखोल चौकशी होणार असल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहेत. यामध्ये मुंबईत नियुक्त असलेल्या दोन अपर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकाऱ्यांसह वरिष्ठ पोलिस अधिकारी, जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असल्याची शक्यता आहे.

कौटुंबिक अडचणी दूर व्हाव्यात यासाठी तोडगा मिळावा म्हणून सल्ला विचारण्यासाठी गेलेल्या विवाहितेला तांब्याच्या भांड्यातील पाणी पिण्यास देत, पेढा खाऊ घालत मंत्रोच्चार करण्यास सांगत गुंगी आल्यानंतर शारीरिक संबंध करण्यास भाग पाडण्याच्या चौथ्या गुन्ह्यात भोंदू खरातला एसआयटीच्या पथकाने सोमवारी अटक केली होती. मंगळवारी पाच दिवस म्हणजेच १८ पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. गुन्हा रजिस्टर नंबर ७८/२६ भारतीय न्याय संहिता बलात्कार आणि महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल चौथ्या गुन्ह्यात त्याला न्यायालयात हजर करण्यात आले होते.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# साक्षी आजच्या मुलींसाठी दुसरी एकविराच- डॉ. जयश्री थोरात

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

अहिल्यानगर पोलीस दलात निवड झाल्याबद्दल सौ. साक्षी पावसे अरगडे यांचा नुकताच सौ. जयश्रीताई थोरात यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. त्यांच्या या यशामागे असलेली जिद्द, चिकाटी आणि अथक मेहनत ही आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्या आजच्या मुलीसाठी दुसरी एकविराच असून, त्यामुळे महिला क्षेत्रात मागे नसल्याचे उदाहरण साक्षीच्या रूपाने आहे. एक वर्षाचा बाळ



असताना देखील तिने फिजिकल फिटनेस कायम ठेवला, त्यामुळे महाराष्ट्रात असे एकमेव उदाहरण असेल. ते आपल्या सर्वांसाठी आजच्या मुलीसाठी खूप प्रेरणादायी आहे. त्याचा आपला सर्वांनी आदर्श घेतला पाहिजे.

एका यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते, असे आपण नेहमी ऐकतो; मात्र साक्षी पावसे यांच्या यशामागे अविनाश पावसे सर यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांनी सातत्याने मार्गदर्शन आणि पाठबळ दिल्यामुळेच साक्षी यांनी हे यश संपादन केले. पुढेही ते असेच मार्गदर्शन करत राहतील, असा मला विश्वास आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार मानण्यात आले.

या याप्रसंगी नीलम ताई खताळ, राजन दादा शिंदे, रमेश गुंजाळ, मधुभाऊ गुंजाळ, सरपंच, विकास गुंजाळ, डॉ. सुरेश बालोडे, जयहिंद करिअर अकॅडमीचे संचालक गुंजाळ सर तसेच साबळे सर आदी मान्यवर उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार एडवोकेट मधुकर गुंजाळ यांनी मानले.

सौ. साक्षी पावसे यांच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.र

# जिजामाता स्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-




जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्या जिज्ञासा कुलकर्णी, समन्वयक संदीप आभाळे व प्रियंका कर्डीले यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली, तसेच उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांनीही अभिवादन केले.

इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी छोटीशी नाटिका सादर करून विविध मूल्यांविषयी माहिती दिली.

यानंतर प्राचार्या जिज्ञासा मॅडम यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी डॉ. आंबेडकर यांचे कार्य, त्यांचे शिक्षणप्रेम, समाजासाठी केलेले योगदान आणि भारतीय संविधान निर्मितीत त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका, संविधानाच्या प्रस्तावनेचा सविस्तर अर्थ याविषयी माहिती सांगितली. संविधानाचे महत्त्व आणि त्यातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये विद्यार्थ्यांनी समजून घ्यावीत, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांबद्दल आदर व प्रेरणा निर्माण झाली.शेवटी सर्वांनी एकत्र येऊन समानता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचे पालन करण्याची प्रतिज्ञा घेत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# डॉ. आंबेडकर हे भारताचे श्वास - प्रा. चं. का. देशमुख

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतरही एकसंघ भारतामुळे देशाची प्रगती होत आहे. ही केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या अभ्यासपूर्ण संविधानामुळे शक्य आहे. अनेक क्षेत्रातील भारताची प्रगती हे याचं द्योतक आहे. म्हणूनच डॉक्टर आंबेडकर हे भारताचे श्वास आहेत, असे विचार समाजसेवक चं. का. देशमुख यांनी व्यक्त केले.

संगमनेर तालुक्यातील राज्यात आदर्श ठरलेल्या तीगाव येथे शाहू - फुले - आंबेडकर या महापुरुषांची संयुक्त जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष आधार फाउंडेशनचे समन्वयक सुखदेव इल्हे होते. विचारपीठावर




आदर्श गावचे सरपंच ज्ञानेश्वर सानप, सामाजिक कार्यकर्ते प्रा. आर. वाय. कमलाकर, रामदास सोनवणे, पोलीस पाटील दत्तू इल्हे, पंचशील फ्रेंड सर्कलचे अध्यक्ष राजेंद्र गायकवाड हे होते.

आंबेडकर ही परीक्षार्थी नसून ज्ञानार्थी होते. त्यांच्या राजगृहात जगभरातील नामवंत ५० हजार पेक्षा जास्त पुस्तके होती. जगातील २१ पेक्षा जास्त संविधानाचा अभ्यास करून समता, बंधुता, न्याय व लोकशाही मूल्यांची जोपासना करणारे लिखित संविधान भारताला दिलेली महान देणगी आहे, असेही देशमुख यांनी सांगितले.

आदर्श सरपंच ज्ञानेश्वर सानप यांनी सांगितले की, केवळ महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नामुळे देशातील अस्पृश्यता, उच्च-नीच भेदभाव दूर झाला. विभिन्न धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहत आहेत.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते रामदास सोनवणे, हर्षल इल्हे, कार्यक्रमाचे अध्यक्ष सुखदेव इल्हे, तसेच शालेय विद्यार्थी यांनी आपले विचार व्यक्त केले.

याप्रसंगी आधार फाउंडेशनचे समन्वयक विठ्ठल कडूसकर, बाळासाहेब पिंगळे, सोमनाथ मदने, लक्ष्मण कोते, सुषमा इल्हे, सुनील तुपसुंदर, संतोष सानप, रामनाथ सानप, सुदाम एलके आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी संपन्न करण्यासाठी बाबासाहेब गायकवाड, अशोक गायकवाड, संजय गायकवाड, अमोल गायकवाड, राम गायकवाड, रवींद्र गायकवाड, ग्रेग ओहळ, दिलीप गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर साबळे यांनी केले.

## सुप्रिया सुळेंच्या जावयाच्या कंपनीसोबत फडणवीसांचा करार

मुंबई (प्रतिनिधी)-

राज्यातील ऊर्जा क्षेत्रात मोठी गुंतवणूक होणार असल्याची महत्त्वाची घोषणा समोर आली आहे. सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवती सुळे आणि सारंग लखानी यांचे लवकरच लग्न होणार असताना, सारंग लखानी यांच्या कंपनीने राज्य सरकारसोबत मोठा सामंजस्य करार केला आहे. या कराराची एकूण किंमत सुमारे ५ हजार ७६० कोटी रुपये असून, हा प्रकल्प राज्यातील वीज निर्मिती क्षमतेत मोठी भर घालणार असल्याचे सांगितले जात आहे. हा करार नोव्हँरियन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीसोबत करण्यात आला आहे. जलसंपदा विभागाच्या माध्यमातून हा प्रकल्प उभारण्यात येणार असून, रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील रानवाडी येथे त्याची अंमलबजावणी होणार आहे.

# अण्णाभाऊ साठे वाचनालयात आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वाचनालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला आदरांजली वाहिली.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे संगमनेर तालुक्यातील देवगाव येथील कन्या सोनाली वाकळे हिची ठाणे शहर पोलीस दलात निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला. तिच्या यशाबद्दल उपस्थितांनी कौतुक व्यक्त करत शुभेच्छांचा वर्षाव केला. ग्रामीण भागातील मुलींसाठी सोनाली वाकळे ही प्रेरणादायी उदाहरण ठरत असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले. हा कार्यक्रम अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती व ब्ल्यू पँथर ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते.

यावेळी अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष विकास जाधव, तसेच ब्ल्यू पँथर ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष आकाश अण्णा गोडगे, अमर जाधव, प्रवीण आव्हाड, राहुल तुपसुंदर, रवी आरणे, किरण घारे, साई खरात, गौरव आरणे, संदीप आव्हाड, गणेश आव्हाड, सागर जाधव, सोहम आव्हाड, अमोल तुपसुंदर तसेच यांसह अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी सामाजिक एकतेचा संदेश देत डॉ. बाबासाहेबांच्या व लो. अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला.

# अध्यात्म आणि प्रपंचाचा संगम - संत गोरा कुंभार

संत गोरा कुंभार यांची पुण्यतिथी आहे. आपल्या कर्मामधून मानवी जीवनाचा संदेश देणारे संत गोरा कुंभार हे महाराष्ट्रातील एक थोर संत. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. सर्व संतांनी मानवतावाद शिकवला. आपल्या जगण्याचा वर्तमान सुंदर कसा होईल, हे संतांनी शिकवले. या संतांच्या मांदियाळीमध्ये संत गोरोबा काका हे तेराव्या शतकातील महाराष्ट्रातील एक थोर वारकरी संत आणि विठ्ठलाचे परम भक्त होते. आपल्या पायाखालची माती तुडवतानाही गोरोबा काका हे विठ्ठल भजनामध्ये दंग असायचे, कारण विठ्ठल हाच त्यांचा श्वास, त्यांचा ध्यास होता. त्यांच्या आईचे नाव रखुमाई आणि वडिलांचे नाव माधव बुवा होते. गोरोबाकाका हे संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांचे समकालीन होते. अध्यात्म आणि प्रपंच एकत्र कसे करावे, त्याचे एक आदर्श उदाहरण म्हणजे संत गोरा कुंभार होय. त्यांच्याबद्दल एक आख्यायिका सांगितली जाते. त्यांच्या पत्नीने मुलाला मातीच्या राशीजवळ खेळायला सोडून दिले. इकडे गोरोबा काका हे पायाखाली माती तुडवीत असताना विठ्ठल भजनामध्ये दंग झाले होते. माती तुडवीत असताना विठ्ठल भक्तीमध्ये तल्लीन झालेल्या गोरोबा काकांना आपल्या पायाखाली आपला मुलगा आला आणि त्याचा मृत्यू झाला, हे कळाले देखील नाही. विठ्ठलाच्या निस्सीम भक्तीमुळे ते देहभान विसरून गेले होते, परंतु विठ्ठलानेच नंतर मुलालाही वाचवले. ही विठ्ठलाची कृपा.

संत मंडळींमध्येचे वडील असल्यामुळे त्यांना काका म्हटले जायचे. त्यामुळे ते परम वंदनीय आणि आदरणीय होते. एक विरागी पुरुष म्हणून त्यांची ओळख होती. निर्गुण निराकार परब्रह्माचे लौकिक रूप म्हणजे गोरोबा काका. आपल्या माती कामामधून त्यांनी भक्तीचा संदेश दिला. मडके घडवताना विठ्ठलाशी एकरूप झाले. विठ्ठलाच्या नामाचा जप आणि गजर करीत. त्यांच्या अभंगांमध्ये लौकिक जीवनातील दुःख, भक्तीचा आनंद यांचा संगम आहे. कर्म हेच ईश्वर आहे, असे त्यांनी सांगितले. भक्ती करण्यासाठी संसार सोडू नका, ईश्वराचे नामस्मरण करा. त्यांच्या जीवनात असा एकदा प्रसंग आला. हे संत ज्ञानेश्वरांच्या सांगण्यावरून संत निवृत्तीनाथ, संत सोपान देव, संत मुक्ताबाई, संत नामदेव, संत चोखामेळा, विसोबाखेचर आदी संतांनी कोणाचे मडके (डोके) किती पक्के आहे, अशी प्रत्येकाच्या डोक्यावर थापटणे हे हातात घेतले आणि त्यांनी हसत



हसत कामाला सुरुवात केली.

प्रथम निवृत्तीनाथांचे डोके घेतले. त्यावर थापटण्याने आवाज केला. नुसत्या आवाजावरून त्यांना अंदाज आला. नंतर ज्ञानदेवांच्या डोक्यावर थापटणे मारले. ही दोन्ही मडकी पक्के दिसतात, असा निर्णय दिला. नंतर ते नामदेवां जवळ गेले. त्यांच्या डोक्यावर थापटणे मारणार, तोच नामदेव गरजले, काका हा काय उद्योग चालू आहे? लोकांना घरी बोलून त्यांची डोके फोडावी, हा कोणत्या गावचा आदर सत्कार. गोरोबांनी निर्णय दिला, सर्व मडक्यामध्ये हेच काय ते कच्चे दिसते. मुक्ताबाई जरा फटकळ बोलली. ती म्हणाली, काका तुमची परीक्षा बरोबर आहे. मडक्यांना जसे भाजतात, तसे घटाला तयार केले पाहिजे. यांनी अजून गुरुपदेश घेतला नाही.

अखंड जगायला देवाचा शेजार, त्याचा अहंकार का नाही गेला? अहंकार गेल्याशिवाय ज्ञान नाही. मुक्ताबाईचे हे सर्व बोलणे ऐकून सर्व संत मंडळी चकीत झाली. नंतर संत नामदेवांनी विठोबा खेचरांना गुरु केले. संत गोरोबा काका यांचे अभंग म्हणजे रसाळ वाणीचा झरा. सामान्य माणसाला समजेल अशा साध्या भाषेमध्ये त्यांनी अभंग केले. केशवाचे ध्यान धरुनी! मृत्तिके माझारी नाचतसे! विठ्ठलाचे नामस्मरे वेळोवेळ! नेत्री वाहे जळ सद्गतीत!! केशवाच्या भेटी लागले पिसे! विसरले कैसे देहभान! झाले झळ पाणी झाले झडपणी! संचारले मनी आधी रूप!! न लिंपेची कर्मी, न लिंपेची धर्मी! न लिंपे गुणधर्म पुण्य पापा!! म्हणे गोरा कुंभार सहज जीवनमुक्त! सुखरूप अद्वैत नाम देवा!!

संत गोरोबा काकांनी समाजाला संदेश दिला, अहंकार सोडला पाहिजे. आपला घट, आपले डोके हे ठिकाणावर ठेवून विठ्ठल भक्तीमध्ये त्याचा आनंद घेतला पाहिजे. अहंकार सोडून आत्मबुद्धीने आपल्याला परमार्थ साधता येतो. निर्मळ भक्ती केली पाहिजे. भक्तीमध्ये भेदाभेद नसावा. गोरोबा काकांनी सांगितले की, तळागाळातील माणसे भक्तीद्वारा आत्मसाक्षात्कार करू शकतो. मातीच्या घड्यांप्रमाणेच आपणही आपले जीवन विठ्ठल भक्तीच्या आनंदातून घडवण्याचा संदेश गोरोबा काकांनी दिला. खरोखर आज संत गोरा कुंभार यांच्या विचाराची गरज आहे. आज माणसाला जगण्याचे भान राहिलेले नाही. आपल्या जाणिवा नष्ट होत चालल्या आहेत. माणूसच वस्तू झाला आहे. युज अँड थ्रोची संस्कृती वाढत चालली आहे. माणसाचा संवाद कमी झाला आहे.

अशा काळात संत गोरा कुंभार यांचा आपले जीवन आनंदी कसे घडेल, हा संदेश उपयोगी पडतो. संतलोक आपणाला आपल्या जगण्याचा युज सांगतात आणि आपल्या जगण्याच्या विकृतीमधून काय थ्रो करायचे, हे सांगतात. आपल्या जगण्याचा वर्तमान हा रमणीय कसा करता येईल, हे संत गोरोबा कुंभार यांनी सांगितले. आपले मडके कच्चे असेल, तर जीवनात त्याचा काहीही उपयोग नाही. म्हणून विठ्ठलाच्या भक्तीमध्ये आपले मडके पक्के भाजून घ्यावे आणि विठ्ठल भक्तीचा आनंद घ्यावा. त्यासाठी संसार सोडावा लागत नाही. संसारात राहून प्रपंच करून आपल्याला परमार्थ साधता येतो. याचे उत्तम उदाहरण गोरोबा काकांनी आपल्याला दिले. आज त्यांची पुण्यतिथी. अशा या थोर संत महात्म्याला, की जे स्वतःच विठ्ठलमय होऊन गेले होते, त्यांना भावपूर्ण नमस्कार.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# सर्व धर्म समभावाचा महामार्ग स्वीकारा - सोन्नर

## शिव-फुले-शाहू-आंबेडकर' व्याख्यानमालेत समाजप्रबोधन

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

वारकरी संप्रदाय हा समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारा जीवन प्रवाह आहे. कोणत्याही जाती-धर्माचा द्वेष न करता सर्वधर्म समभावाची शिकवण देणारा महामार्ग स्वीकारा, असा सल्ला श्यामसुंदर सोन्नर महाराज यांनी दिला.

तालुका पुरोगामी विचारधारेचे बळीराजा अभ्यास मंडळ व संयुक्त जयंती उत्सव समिती आयोजित 'शिव-फुले-शाहू-आंबेडकर' व्याख्यानमालेत १३ एप्रिल रोजी 'समतेची शिकवण देणारा वारकरी संप्रदाय आणि आजचा महाराष्ट्र' या विषयावर आयोजित व्याख्यानातून सोन्नर महाराज यांनी मार्गदर्शन केले. जाती-धर्माच्या भिंती पाडून समाजात ऐक्य निर्माण करण्याची ताकद वारकरी संप्रदायात आहे. आजच्या आधुनिक युगात भौतिक प्रगतीसोबत नैतिक मूल्यांचे जतन आवश्यक असून, संत परंपरेतील विचार युवकांनी आत्मसात करावेत, असे आवाहन श्यामसुंदर महाराज यांनी केले.

राज्यात पन्नासहून अधिक मुस्लिम कीर्तनकार होऊन गेले. आजही २२ मुस्लिम समाजातील कीर्तनकार वारकरी समाजप्रबोधन करत आहेत. प्रार्थनास्थळे मानवनिर्मित आहेत, त्यांना हानी पोहोचवून कोणताही धर्म सुखी होणार नाही. संतांचे विचार महापुरुषांनी अंगिकारले. त्यांच्या विचारांच्या खांद्यावर आज आपण तरलो आहोत, असे ते म्हणाले.

सत्राच्या अध्यक्षस्थानी संपत महाराज भोर, तर स्वागताध्यक्ष भाऊराव उघडे होते. प्राजक्ता वाकचौरे यांनी सूत्रसंचालन केले. संदेश कासार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी आमदार डॉ. किरण लहामटे, माजी प्राचार्य प्रकाश टाकळकर, कॉम्रेड डॉ. अजित नवले, साथी विनय सावंत, गिरिजा पिचड, विजय वाकचौरे, प्रा. विजय भगत, उत्कर्षा रूपवते, डॉ. अनिल वाघ, शिवाजी नेहे, अरीफ तांबोळी, राजेंद्र पावसे, गिरजाजी जाधव, विजया पाडेकर, प्रा. रंजना कदम भाग्यवंत, प्रा. डॉ. नितीन आरोटे, डॉ. संदीप कडलग, प्रकाश साळवे, भाऊ चासकर, रवीं रूपवते, अनिल मोहिते, भाऊसाहेब कासार आदी उपस्थित होते.

देशातील शेतकरी वर्गाची टक्केवारी घटत चालली असून, शेतकरी अधिकच कंगाल होत आहेत. त्यामुळे सरकारने धनदांडग्यांचे लाड कमी करून कष्टकरी व शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी ठोस धोरणे राबवावीत, तरच शेतकरी आत्महत्या कमी होण्यास मदत होईल. 'शेती आणि शेतकऱ्यांसमोरील आव्हाने' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार पी. साईनाथ म्हणाले की, शेतकऱ्यांना न्याय मिळवण्यासाठी अनेकदा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागतो. इतिहास साक्षी आहे की, सरकार व भांडवलदारांना झुकावे लागते. देशात लुटमार सुरू असून, शेतकरी पिळला जात आहे. शेतीमालाला हमीभाव, कर्जमाफीपेक्षा थेट अनुदान व निर्यात धोरण यावर सरकारने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

## संपादकीय...

# अंधश्रद्धा की अज्ञान?

महाराष्ट्रासारख्या प्रगत आणि विचारशील राज्यात आजही अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीचे सावट कायम आहे, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. विज्ञाननिष्ठ विचारांची परंपरा, संतांची समता आणि विवेकाची शिकवण, तसेच सामाजिक सुधारकांची परंपरा लाभलेल्या या भूमीत भोंदू बाबांचे वाढते साम्राज्य समाजाच्या बौद्धिक आरोग्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. अलीकडच्या काळात विविध ठिकाणी भोंदूगिरीच्या घटना उघडकीस येत आहेत, ज्यातून समाजातील अज्ञान, भीती आणि अंधविश्वासाचे दाहक वास्तव समोर येते. भोंदू बाबा म्हणजे केवळ एक व्यक्ती नसून, ती एक मानसिकता आहे जी लोकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेते. आजार बरा करण्याच्या नावाखाली, भविष्य सांगण्याच्या बहाण्याने, किंवा कौटुंबिक अडचणी दूर करण्याच्या आश्वासनावर अनेक निरपराध लोकांना फसवले जाते. शिक्षणाचा प्रसार वाढला असला, तरी विवेकबुद्धीचा वापर करण्याची सवय मात्र सर्वसामान्यांमध्ये अद्याप दृढ झालेली दिसत नाही. म्हणूनच भोंदूगिरीला खतपाणी मिळते. अंधश्रद्धेचे मूळ अनेकदा भीतीत आणि असुरक्षिततेत असते. आर्थिक, सामाजिक किंवा वैयक्तिक अडचणींनी ग्रस्त असलेला माणूस सहजपणे अशा भोंदू लोकांच्या प्रभावाखाली जातो. त्याला वाटते की, एखादा चमत्कार त्याचे आयुष्य बदलू शकतो. पण हा चमत्कार प्रत्यक्षात फसवणुकीचा जाळा असतो. या प्रक्रियेत केवळ आर्थिक शोषणच होत नाही, तर अनेक वेळा शारीरिक आणि मानसिक अत्याचारही सहन करावे लागतात. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदे अस्तित्वात आहेत, आणि विविध सामाजिक संघटना या विषयावर काम करत आहेत. तरीही भोंदूगिरीचे प्रकार थांबत नाहीत, याचा अर्थ केवळ कायद्याने हा प्रश्न सुटणार नाही. समाजाच्या मानसिकतेत बदल होणे आवश्यक आहे. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील सूक्ष्म फरक ओळखणे गरजेचे आहे. श्रद्धा ही विवेकावर आधारित असते, तर अंधश्रद्धा ही विचारशून्य आचरणावर आधारित असते. संत परंपरेने नेहमीच विवेक, समता आणि मानवतेचा संदेश दिला आहे. त्यांनी कधीही अंधानुकरणाला प्रोत्साहन दिले नाही. आज मात्र काही भोंदू लोक संतांच्या नावाचा आधार घेऊन स्वतःचा स्वार्थ साधत आहेत. ही गोष्ट अधिक धोकादायक आहे, कारण त्यामुळे खरी आध्यात्मिक परंपराच बदनाम होते. समाजाने अशा प्रवृत्तींचा ठामपणे विरोध केला पाहिजे. माध्यमांची भूमिका या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. भोंदूगिरीचे प्रकार उघडकीस आणणे, लोकांमध्ये जागृती करणे, आणि वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे हे माध्यमांचे कर्तव्य आहे. तसेच शाळा आणि महाविद्यालयांमध्येही विद्यार्थ्यांना वैज्ञानिक विचारसरणीचे शिक्षण देणे गरजेचे आहे. केवळ पुस्तकातील ज्ञान नव्हे, तर प्रश्न विचारण्याची आणि तर्कशुद्ध विचार करण्याची सवय रुजवली पाहिजे. पालकांची जबाबदारीही कमी नाही. लहानपणापासूनच मुलांना योग्य आणि अयोग्य यातील फरक समजावून सांगणे, अंधश्रद्धांपासून दूर ठेवणे, आणि विवेकाने वागण्याची शिकवण देणे आवश्यक आहे. कारण आजचे बालकच उद्याचा समाज घडवणार आहे. अखेर, भोंदूगिरीचा प्रश्न हा केवळ कायद्याचा किंवा प्रशासनाचा नाही, तर तो संपूर्ण समाजाचा आहे. प्रत्येकाने स्वतःच्या विचारांची चिकित्सा करणे आवश्यक आहे. कोणत्याही चमत्कारावर विश्वास ठेवण्याआधी त्यामागील सत्य जाणून घेण्याची वृत्ती विकसित झाली पाहिजे. अंधश्रद्धेच्या अंधारातून बाहेर पडून विवेकाच्या प्रकाशाकडे वाटचाल करणे ही काळाची गरज आहे. आज गरज आहे ती जागरूक समाजाची, जो प्रश्न विचारेल, सत्य शोधेल आणि कोणत्याही भोंदूगिरीला बळी पडणार नाही. अन्यथा, प्रगतीच्या मार्गावर असताना देखील आपण मानसिक गुलामगिरीत अडकून राहू. म्हणूनच, अंधश्रद्धा की अज्ञान हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.


**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com — दूरध्वनी (०२४२५) २२५३५३

क्र. कावी/ जन्म नोंद/५३५/२०२६ — संगमनेर, दिनांक - २४/०३/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. शेख सलीम इब्राहीम मुजावर, रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०५/०३/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे शेख सलीम इब्राहीम मुजावर यांचा जन्म मौजे संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०३/०५/१९६७ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


# यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून कौशल्यला मिळणार सन्मान- डॉ. सुधीर तांबे




संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- शिक्षणापासून वंचित असलेल्या मात्र शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या अनेक युवकांना व कारागिरांना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून शिक्षणाची मोठी संधी संगमनेरमध्ये उपलब्ध झाली असून, यामुळे या युवकांमध्ये असलेल्या कौशल्याला शिक्षणाचा मोठा सन्मान मिळणार असल्याचे प्रतिपादन जयहिंद लोकचळवळचे संस्थापक मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांनी केले आहे.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण पूर्व शिक्षण मान्यता मूल्यांकन केंद्राची बैठक संपन्न झाली. यावेळी केंद्राचे संचालक डॉ. राम ठाकूर, डॉ. प्रकाश देशमुख, सौ. दुर्गाताई तांबे, आतिक शेख, डॉ. दानिश शेख, ज्ञानेश्वर नाईक, भाईजान तांबोळी, अवेज खान, समन्वयक उबेद शेख, मोहसीन शेख, सौ. सुनीता कांदळकर, अंजुम बागवान आणि सह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, शिक्षण ही भिंतीच्या आतमध्येच दिले जाते असे नाही, तर परिस्थितीमुळे अनेक जण शिक्षणापासून वंचित राहू शकतात. या सर्वांना शिक्षणातून सन्मान मिळाला पाहिजे. याकरता मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून संगमनेरमध्ये शैक्षणिक प्रमाणपत्र केंद्र सुरू झाले आहे.

अनेक युवक कारागीर यांना विविध कौशल्य पूर्णपणे अवगत असतात, परंतु शैक्षणिक प्रमाणपत्र त्यांच्याकडे नसते. एखादी व्यक्ती उच्चशिक्षित अभियंता पेक्षाही उत्कृष्ट मेकॅनिक असतो, किंवा महिला भगिनी कोणतेही शिक्षण न घेता ही उत्कृष्ट टेलरिंग, ब्युटी पार्लर अशी कामे करतात. या सर्वांच्या कौशल्याला प्रमाणपत्राचा आधार मिळावा आणि त्यांचा शिक्षणातून सन्मान व्हावा, या उद्देशाने सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालयांमध्ये कौशल्य आधारित प्रमाणपत्र मिळणार आहेत. याकरता शिक्षणाची मोठी अट नसून इच्छाशक्ती महत्त्वाची आहे.

अनेक तरुण-तरुणी औपचारिक शिक्षण नसले तरी ते इलेक्ट्रिशियन, फिटर, वायरमन, प्लंबर, टेलरिंग अशा विविध क्षेत्रात प्रवीणतेने काम करत आहेत. त्यांना या शैक्षणिक अभ्यासक्रमाचा नक्कीच उपयोग होणार आहे. जय हिंद लोक चळवळीच्या माध्यमातून युवकांमध्ये कौशल्य निर्मितीबरोबर स्वयंरोजगारास प्रोत्साहन मिळावे, याकरता या माध्यमातून काम सुरू असल्याचे माजी आमदार डॉ. तांबे म्हणाले. तर संचालक डॉ. राम ठाकूर म्हणाले की, मुक्त विद्यापीठाने अनेकांच्या जीवनामध्ये शैक्षणिक समृद्धीबरोबर आनंद निर्माण केला आहे. चार भिंतीच्या आतील शिक्षण दैनंदिन कामातून दिले जात असल्याने वेळ आणि खर्च वाचत असून, यामुळे अनेकांना आपला रोजगार व्यवसाय सांभाळता येत आहे. संगमनेरमधील हा उपक्रम नक्कीच अनेकांना संधी देणारा ठरणार असल्याचे ते म्हणाले.

कौशल्य शिक्षणाची नवी संधी. अनेक युवकांमध्ये चांगली कौशल्य असून, फक्त प्रमाणपत्र अभावी त्यांना वाव मिळत नाही. म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या माध्यमातून सुरू झालेल्या मूल्यांकन केंद्राच्या माध्यमातून या सर्व तरुणांना सन्मान मिळणार असल्याचे समन्वयक उबेद शेख यांनी म्हटले आहे.

# सह्याद्री ज्युनिअर कॉलेजमध्ये डॉ. आंबेडकर जयंती जल्लोषात



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री ज्युनिअर कॉलेजमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंतीच्या निमित्ताने स. ब. वि. प्र. समाजाचे संचालक बाबा खरात सर, सह्याद्री ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य एस. एम. खेमनर सर, सहकार महर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ सर, पर्यवेक्षक बी. एस. कुटे सर, शिक्षक प्रतिनिधी प्रा. गणेश गुंजाळ, ज्येष्ठ शिक्षिका देशमुख मॅडम, सुपेकर मॅडम, भुसाळ मॅडम, ज्येष्ठ शिक्षक प्रा. गुंड उपस्थित होते. प्राचार्य एस. एम. खेमनर यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

स. ब. वि. प्र. समाजाचे संचालक बाबा खरात सर यांनी उद्धरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे या गीताच्या माध्यमातून महामानवाला अभिवादन केले. प्रा. धाकतोडे सर यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनाबद्दल माहिती सांगितली. व त्यांनी काळाराम मंदिर सत्याग्रह, महाडचे चवदार तळे या सत्याग्रहाबद्दल विवेचन केले. तसेच मराठी साहित्यिक प्रा. भालेराव सर यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनाबद्दल अनमोल मार्गदर्शन करून शिक्षकांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत रुजवणे किती गरजेचे आहे, हे त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. तसेच सह्याद्री जुनिअर कॉलेजचे प्राचार्य एस. एम. खेमनर सर यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा विचार शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मूलमंत्र आपण प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना शिकवताना त्यांच्या मनामध्ये बिंबवणे गरजेचे आहे आणि शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून द्यावे. तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जगताप एन. आर. यांनी केले.

या कार्यक्रमासाठी प्रा. दिघे बी. टी., थोरात सर, दातीर सर, जगताप एम. टी. सर, प्रा. शिंदे बी. जी., वर्पे सर, नवले सर, भोकनळ सर, कोहकडे सर, सूर्यवंशी सर, कोल्हे सर, दुसाने सर व नरेंद्र गायकवाड हे देखील उपस्थित होते.


**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे — मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे — मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत **डायलेसिस सुविधा उपलब्ध**


या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५



युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२



टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com

वाटचाल तीन दशकांची








卐 **अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर** 卐

MALPANI **मालपाणी उद्योग समूह** आयोजित

**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर

- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

**सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा**

नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक

**विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!**

संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर

श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)


## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी


**श्री साई मेस**
आमच्याकडे शुद्ध शाकाहारी घरगुती मेस आहे
शुद्ध शाकाहारी जेवण तयार करुन मिळेल संगमनेर
8530530656

**पाहिजेत**
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता - तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला पाहिजे
कॉम्प्युटर ऑपरेटर - २
हेल्पर - २
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग - १ जागा
दुकानकामासाठी - ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**गाळा विकणे आहे**
२४५ स्क्वे.फुट आर.सी.सी. बांधकाम असलेला चैतन्यनगर येथील गाळा विकणे आहे
9405261738
9822315031

**पाहिजेत**
अनुभवी स्त्री/ पुरुष सेल्समन व हेल्पर
संपर्क
कटारिया क्लॉथ सेंटर
पत्ता - मेन रोड, संगमनेर ४२२६०५
9595225428

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट - १ (महिला)
वेळ - सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
7498749500

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**रॅक विकणे आहे**
सुपर शॉपी, किराणा दुकान, मेडिकल किंवा इतर दुकानांसाठी लागणाऱ्या रॅक आणि काउंटर विकणे आहे
(सर्व मटेरियल नवीन आहे फक्त दोन महिने वापर झाला)
9881855547

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

खुशखबर...
आपल्या मुला मुलींचे लग्न आमच्या प्रशस्त मंगल कार्यालयात करा
**साई मंगल लॉन्स**
थोड्याच तारखा शिल्लक
पत्ता- समनापुर, एच पी पेट्रोल पंप शेजारी
संपर्क- प्रताप गोडगे
9890924380

**वॉचमन पाहिजे**
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क - नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
संगमनेर शहरात ऑफिस कामाकरिता पदवीधर मुलगा पाहिजे
आकर्षक पगार
9881855547

**CHANGE IN NAME**
1, NAZEER MOHAMMED BASHIR SHAIKH HAVE CHANGED MY OLD NAME NAAZIR MOHAMED BASHIR SHAIKH TO NEW NAME AS NAZEER MOHAMMED BASHIR SHAIKH
ADDRESS - JORVE ROAD, NEAR TAMBOLI GUARAGE, RAHEMAT NAGAR, TAL - SANGAMNER, DIST- AHILYANAGAR, (MH) PIN - 422605

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. असिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# जोर्वे विद्यालयात आंबेडकर जयंती उत्साहात



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

जोर्वे येथील समता विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती विविध कार्यक्रमाने संपन्न झाली. विद्यालयात झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भांगरे बी. आर. होते. महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने विद्यालयात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित समूहगीते व समूह नृत्य सादर करण्यात आली.

शिक्षक मनोगतात डोळस ए. सी. यांनी आंबेडकरांचा जीवनपट सांगितला. या महामानवाने ३२ पदव्या, ९ भाषा अवगत केल्या होत्या, तसेच जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राचे संविधान त्यांनी तयार केले, याविषयी सांगितले. सूत्रसंचालन गिते आर. वाय. यांनी केले. त्यांनी आंबेडकरांचे तत्त्वज्ञान - शिका, संघटित व्हा, संघर्ष करा, वाचाल तर वाचाल, स्वयंशिस्त बाळगा, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे आभार काळे पोपट यांनी मानले. कार्यक्रमास मुख्याध्यापिका भरीतकर एस. जे., ज्येष्ठ शिक्षिका पानसरे सविता, शेवाळे मंजुषा व सर्व शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'स्वार्थ विरहित सेवा' या संकल्पनेप्रमाणेच संगमनेर रोटरी क्लबचे कार्य गौरवास्पद - गव्हर्नर रो. सुधीर लातुरे



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

समाजातील अनेक महनीय व्यक्तींपासून नेहमीच प्रेरणा मिळत असते. पूर्वीची परिस्थिती वेगळी व आत्ताची वेगळी आहे. आयुष्यात कुठेतरी शॉर्ट कट घ्यावा लागतो. समाजाला भेडसावणाऱ्या सर्व अडचणी पायदळी तुडवत घेतलेला विचार, कृती, समाजाला अभिप्रेत जीवन जगण्यास उद्युक्त करत असते. पुरस्कारांसाठी सुयोग्य व्यक्ती शोधण्यासाठी अडचणी येतात. मात्र, संगमनेर रोटरी क्लबच्या माध्यमातून सुयोग्य व्यक्तींची निवड या पुरस्कारासाठी केली, ती सार्थ आहे. समाजासाठी पथदर्शक स्वरूपाची आहे, असे प्रतिपादन रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३२ चे प्रांतपाल रो. सुधीर लातुरे यांनी केले. 'स्वार्थ विरहित सेवा' या संकल्पनेप्रमाणेच संगमनेर रोटरी क्लबचे कार्य गौरवास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. येथील मालपाणी हेल्थ क्लबच्या सभागृहात आयोजित रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या वतीने दिल्या जाणाऱ्या 'रोटरी सक्षम' व 'आत्मनिर्भर' या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून गव्हर्नर रो. सुधीर लातुरे बोलत होते.

यावेळी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या फर्स्ट लेडी सौ. संगीताताई लातुरे, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी रो. डॉ. राजगोपाल तापडिया, असिस्टंट गव्हर्नर रो. अमोल वैद्य, संगमनेर रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. विश्वनाथ मालाणी, सचिव रो. सौरभ म्हाळस हे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये अधिव्याख्याता म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. बायसा गुंजाळ यांना 'रोटरी सक्षम पुरस्कार', तर नांदूर खंदरमाळ येथील डॉ. प्रवीण घुले यांना 'रोटरी आत्मनिर्भर पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना गव्हर्नर रो. लातुरे म्हणाले की, प्रा. बायसा गुंजाळ यांनी दिव्यांगत्वावर मात करून प्रतिकूल परिस्थितीत उच्च शिक्षण घेत विद्यार्थ्यांना केलेले ज्ञानदान हे प्रेरणादायी असल्याचे म्हटले. तसेच प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रात सेवा देण्याचे डॉ. प्रवीण घुले यांचे कार्य तरुणांसाठी मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.

पुरस्कार प्राप्त डॉ. बायसा गुंजाळ व डॉ. प्रवीण घुले यांनी या पुरस्कारामुळे भविष्यात अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा मिळाली असल्याचे सांगितले. आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या सामाजिक संस्थेचा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांनी रोटरी क्लबच्या प्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. प्रास्ताविक व स्वागत संगमनेर रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. विश्वनाथ मालाणी यांनी केले. क्लबच्या विविध सामाजिक व विधायक उपक्रमांचा आढावा क्लबचे सचिव रो. सौरभ म्हाळस यांनी घेतला.

प्रमुख अतिथी रो. लातुरे यांचा परिचय रो. अजित काकडे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो. भारतभूषण नावंदर व रो. सुनील घुले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रो. डॉ. किशोर पोखरकर, रो. विकास लावरे, रो. राजेंद्र खोसे, रो. घुले सर, रो. आनंद हासे, रो. डॉ. प्रमोद राजूरकर, रो. अजित काकडे, रो. समीर शहा, रो. पवनकुमार वर्मा, रो. संकेत काजळे, रो. नरेंद्र चांडक, रो. महेश वाकचौरे, रो. योगेश गाडे यांनी सहकार्य केले. याप्रसंगी क्लबचे सर्व संचालक मंडळ, सदस्य व त्यांचे कुटुंबीय आणि पुरस्कारार्थींचे नातेवाईक उपस्थित होते.

# अकोले तालुक्यातील शेलविहीरे येथे आदिवासी परंपरेनुसार 'आदिम लगीन सोहळा' उत्साहात



अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील शेलविहीरे आणि बाभुळवंडी येथील दोन आदिवासी कुटुंबांनी आपल्या संस्कृतीचे जतन करत 'आदिम लगीन सोहळा' अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा केला. नवरा मुलगा रोहिदास नामदेव जंगले (रा. शेलविहीरे) आणि नवरी मुलगी आरती रामनाथ लेंडे (रा. बाभुळवंडी) यांचा हा विवाह सोहळा आदिवासी संस्कृतीच्या गौरवशाली वारशाचे दर्शन घडवणारा ठरला.

तालुक्यातील आदिवासी समाज आपली संस्कृती आणि परंपरा टिकवून ठेवण्यासाठी नेहमीच अग्रेसर असतो. आधुनिकतेच्या काळातही आपल्या मूळ रुढी-परंपरा विसरू नयेत, या उद्देशाने हा विवाह पूर्णपणे 'आदिम' पद्धतीने पार पडला. रविवारी दुपारी १२:३० च्या प्रकृती मुहूर्तावर निसर्गाच्या सानिध्यात हा सोहळा पार पडला.

या विवाह सोहळ्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे, लग्नापूर्वी शनिवारी शेलविहीरे येथे पारंपारिक 'मांडव डहाळा' आणि 'हळदी समारंभ' पार पडला. लग्नाच्या दिवशी आदिवासी वाद्यांच्या गजरात आणि लोकगीतांच्या सुरावटीत वधू-वरांना शुभआशीर्वाद देण्यात आले. यावेळी उपस्थितांनी आदिवासी नृत्यांचा आनंद घेत या सोहळ्याची शोभा वाढवली.

या 'आदिम लगीन सोहळ्या'ला शेलविहीरे आणि बाभुळवंडी परिसरातील समस्त जंगले व लेंडे परिवार, नातेवाईक आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. पारंपरिक वेशभूषा, स्थानिक बोलीभाषा आणि निसर्गपूजेचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या विवाह सोहळ्याची चर्चा सध्या संपूर्ण तालुक्यात होत आहे.

# राजूरला मिळणार अपर तहसील कार्यालय, निकष निश्चित




अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

अकोले तालुक्यातील राजूर व नेवासे तालुक्यातील घोडेगाव येथे अपर तहसील कार्यालयाची स्थापना होणार असून, त्याबाबत पदांची केवळ निश्चिती करण्यात आली आहे. राज्य शासनाने नवीन अपर तहसील कार्यालयांच्या स्थापनेसंदर्भात कार्यक्षेत्र व मुख्यालय निश्चित करण्यासाठी सविस्तर निकष जाहीर केले आहेत. प्रशासनिक सोयी, लोकसंख्या व कामकाजाची व्याप्ती लक्षात घेऊन हे निर्णय घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

नवीन अपर तहसील कार्यालयाचे कार्यक्षेत्र निश्चित करताना मूळ तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील लोकसंख्या, कामाचा व्याप आणि मंडळांची संख्या यांचा समतोल राखणे आवश्यक राहील. तसेच कार्यक्षेत्र विभागणी करताना प्रशासकीयदृष्ट्या सोयीस्कर व योग्य नियोजन करण्यावर भर देण्यात आला आहे. मुख्यालय निश्चित करताना संबंधित गावांसाठी ते सहज पोहोचण्याजोग्या अंतरावर असावे, अशी अट घालण्यात आली आहे. याशिवाय, स्थानिक परिस्थितीनुसार इतर बाबींचाही विचार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महत्त्वाचे म्हणजे, 'मंडळ' हा घटक कायम ठेवत कोणत्याही एका मंडळाचे विभाजन मूळ तहसील आणि नवीन अपर तहसील कार्यालयामध्ये करू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. संपूर्ण मंडळ एकाच कार्यालयाकडे ठेवण्याची दक्षता घेण्याचे निर्देश आहेत. दरम्यान, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर मुख्यालय व कार्यक्षेत्र निश्चित केल्यानंतर त्याबाबत प्रारूप अधिसूचना प्रसिद्ध करणार आहे. या अधिसूचनेनंतर १५ दिवसांच्या आत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येतील. प्राप्त हरकतींचा विचार करून अंतिम प्रस्ताव शासनाकडे सादर केला जाईल. त्यानंतर शासनाकडून अंतिम अधिसूचना जारी करण्यात येणार आहे.

# संगमनेरात 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान' उत्साहात



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी) -

भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान' अंतर्गत दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिर मालपाणी लॉन्स सभागृहात उत्साहात पार पडले. दिनांक १२ व १३ एप्रिल रोजी झालेल्या या शिबिरात विविध विषयांवर तज्ज्ञ मान्यवरांनी मार्गदर्शन करत कार्यकर्त्यांना संघटनात्मक बळकटी देण्यावर भर दिला. जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर उत्साहात संपन्न झाले. संगमनेर शहर मंडल अध्यक्षा सौ. पायल आशिष ताजणे, पश्चिम मंडल अध्यक्ष श्रीकांत गोमासे, पूर्व मंडल अध्यक्ष गुलाबराव भोसले यांसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्तम आयोजन नियोजन केले. या शिबिरात संगमनेर शहर, पूर्व, पश्चिम मंडळातील शेकडो पदाधिकारी सहभागी झाले होते.

शिबिराच्या पहिल्या दिवशी सिताराम भागरे यांनी कार्यकर्त्यांना पक्षाचा इतिहास, विचारधारा व संघटनात्मक बांधणी याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर रोहितजी चौधरी यांनी 'वैचारिक अधिष्ठान' या विषयावर भाष्य करत पक्षाच्या मूलभूत तत्त्वांची माहिती दिली. 'आपली कार्यपद्धती' या सत्रात डॉ. महेंद्र कोल्हे यांनी संघटनात्मक कामकाजाची दिशा स्पष्ट केली. 'आपल्या सरकारची कामगिरी योजना' या विषयावर काशिनाथ पावसे यांनी विविध योजनांचा आढावा घेत कार्यकर्त्यांना माहिती दिली. दुपारच्या सत्रात 'सोशल मीडिया नमो प व आय. सरल प' या विषयावर साहेबराव वलवे यांनी डिजिटल माध्यमांच्या वापराबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच 'एस. आय. आर मतदार नोंदणी' या विषयावर योगराज परदेशी यांनी मतदार नोंदणी प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित केले. दिवसअखेर अनौपचारिक कार्यक्रमाने वातावरणात उत्साह निर्माण झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी व्यायाम व प्रार्थनेने दिवसाची सुरुवात झाली. त्यानंतर 'बूथ व्यवस्थापन व मन की बात' या विषयावर सुधाकर गुंजाळ यांनी मार्गदर्शन करत निवडणुकीतील बूथ पातळीवरील नियोजनाचे महत्त्व सांगितले. शिबिराचा समारोप प्रदेश सह संयोजक प्रदीपजी पेशकार यांच्या उपस्थितीत झाला. त्यांनी कार्यकर्त्यांना आगामी काळात अधिक जोमाने काम करण्याचे आवाहन केले. पक्षाचे ध्येय धोरणे, सर्व झालेल्या सत्रातील विषयांचा आढावा, विविध शासकीय योजना, पक्ष शिस्त याबाबत सविस्तर व विस्तृत माहिती दिली.

प्रशिक्षण शिबीराची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. महाराष्ट्र भूषण गानकोकिळा आशा भोसले व पक्षाचे ज्येष्ठ दिवंगत कार्यकर्त्यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शिबिराचा समारोप राष्ट्रगीताने झाला. या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यास मोठी मदत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# स्वानुभव नमामि देवी नर्मदे... | भाग - १



नर्मदे हर, नर्मदे हर हा आवाज आला, म्हणून मी मागे वळून पाहिलं, तर दोन-तीन वर्षांचं एक लहान मूल म्हणत होतं, नर्मदे हर. जसं आपल्याकडे लहान मुलांना बोलता यायला लागलं की आपण त्यांना राम राम, मामा, बाबा असं म्हणायला शिकवतो, तसं नर्मदेच्या काठी राहणारे आदिवासी लोकं मुलांना नर्मदे हर बोलायला शिकवतात. मला हे खूप छान वाटलं. हे आदिवासी बांधव सारखं नर्मदे हर, नर्मदे हर असं म्हणतात. या लोकांच्या मते नर्मदा माई दुःख, ताप, क्रोध, गर्व सर्व हरण करते, असा त्यांचा भाव आहे. आणि नर्मदे सर्व दे असे देखील म्हणतात. सर्व दे म्हणजे शांती, समाधान, माधुर्य.

नर्मदा परिक्रमा पूर्ण झाली आणि घरी आल्यानंतर एक विलक्षण शांतीची अनुभूती मिळाली. हा दिव्य अनुभव मिळण्यासाठी तसा उशीरच झाला. गेली दोन वर्ष नर्मदा उत्तरवाहिनी परिक्रमेला जाण्यासाठी मैत्रिणींचे निरोप यायचे. पण म्हणतात ना, कोणतीही गोष्ट वेळ आल्याशिवाय होत नाही. या वर्षी माऊली टूर्सची जाहिरात बघितली आणि ठरवलं, जायचंच. बऱ्याच मैत्रिणींना फोन झाले, मेसेज झाले. मार्च एंडिंगमुळे बऱ्याच पुरुष मंडळींचा नकार होता, पण आम्ही बायका मात्र तयार झालो. माझी जोडी सोडली, तर बाकी सगळ्या एकट्याच. आम्हाला जो आनंदाचा, शांतीचा प्रसाद मिळाला, तो कदाचित आत्ता त्यांच्या नशिबात नसावा. लवकरच त्यांचाही योग येईल, अशी नर्मदामाईला प्रार्थना करते. २७ मार्चला रात्री दहा वाजता आम्ही पंचेचाळीस प्रवासी संगमनेरहून निघालो. पहाटे चारच्या दरम्यान गाडीत काहीतरी बिघाड झाला. रस्त्यावर संपूर्ण अंधार होता. घाटात गाडीतच सर्वजण बसून राहिलो. नर्मदामैया जणू परीक्षाच पाहते आहे की काय, असं मनात वाटून गेलं. सकाळी उजडल्यानंतर एक-एक जण खाली उतरून सकाळचे प्रातःविधी उरकून आले. काहींनी फेरफटका मारला. सूर्योदयाची प्रसन्न अशी वेळ होती. शांत वारा वाहत होता. आम्ही देखील पायी चालत असताना छान अशी वाऱ्याची झुळूक कानाजवळून सुखावत गेली. टूर मॅनेजर गावात गाडीची सोय करण्यासाठी गेले होते. आजूबाजूच्या झाडावर माकडे उड्या मारत होती. लांबवर मोराचा केकारव ऐकायला येत होता. गाडीत आमच्याबरोबर आचारी होताच. गाड्यांची व्यवस्था होईपर्यंत गाडीच्या बाजूला गरमागरम पोहे आणि चहा असा नाश्ता झाला. गावातून प्रवासी गाड्या आल्या आणि पुढचा प्रवास सुरू झाला. सकाळी आठ वाजता पोहोचणारे आम्ही दुपारी तीन वाजता हॉटेलला पोहोचलो.

आंघोळ, जेवण करून ताजेतवाने झालो. भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा भव्य पुतळा 'स्टॅचू ऑफ युनिटी' पाहण्यासाठी निघालो. त्यानंतर गरुडेश्वर मंदिरात दर्शन घेऊन थोड्यावेळ बसलो. मुंबईचे अनेक भक्त दिसून येत होते. तल्लीन होऊन दत्ताचे भजन गात होते. वातावरण एकदम भक्तीमय झालं होतं. हे सर्व पाहताना असं वाटत होतं की, कधी एकदाची सकाळ होते आणि आपण नर्मदा परिक्रमेला सुरुवात करतो. उत्सुकता वाढत चालली होती. आमच्या पैकी पंधरा लोकं पायी चालत जाणार होते. बाकी वयस्कर मंडळी गाडीने किंवा रिक्षाने जाणार होते. रात्री ठरले, पायी परिक्रमा करणाऱ्यांनी दीड वाजता उठायचं. गजर लावला. गजर व्हायच्या आधीच जाग आली. घड्याळ पाहिलं, तर एक वाजून अठ्ठावीस मिनिटं झाली होती. आता काय म्हणावं, गजर होण्यापूर्वीच तिने जागं केलं. इथूनच प्रचिती यायला सुरुवात झाली.

जगन्नाथ कुंटे (नर्मदे हर या पुस्तकाचे लेखक) म्हणतात, सगळी काळजी त्या नर्मदमायीलाच. स्नान वगैरे आटोपून आम्ही सर्वजण पूर्वाश्रमीचे संगमनेर येथील श्री. सतीश कांबळे सर यांच्या आश्रमात गेलो, जे पूर्वी आमच्या मुलांचे शिक्षक होते. ते आता नर्मदाकिनारी तिलकवाडा येथे वास्तव्यास आहेत. तेथे त्यांनी शंकर महाराज मठ बांधला आहे. तिथेच त्यांची साधना सुरू आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आमची परिक्रमा चालू झाली. सरांनी आमच्याकडून संकल्प सोडून घेतला. त्यांनी आम्हाला परिक्रमेची संपूर्ण माहिती दिली. परिक्रमेसाठीच्या तीन महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या. एक म्हणजे संकल्प सोडून झाल्यावर जे नर्मदा जल आमच्या पोटात गेलं, ते जल आणि नर्मदेच्या बाजूने चालताना नर्मदा नदीचं जल, तिचा प्रभाव तुमच्यावर पडतो. नर्मदेचं चुंबकीय क्षेत्र, तिचा होरा, तिची शक्ती ही तुमच्या जलशक्तीला मॅच होते आणि तुम्हाला तुमच्या अंतर्गत बदल जाणवतो. दुसरं म्हणजे नामस्मरण. जितकं नामस्मरण करता येईल, तितकं करा. गप्पा गोष्टी भजन न करता नामस्मरण करायचं. आपण घरी १००० माळा जप केल्याचं फळ आणि इथे नर्मदा तटावर फक्त एक माळ जप केल्याचं फळ हे सारखं आहे. त्याचं कारण म्हणजे इथे अनेक साधुसंतांनी साधना केली आहे. त्यांची ऊर्जा इथल्या अणूरेणूत पुरेपूर भरली आहे. अजूनही ते साधुसंत इथे सूक्ष्म स्वरूपात विद्यमान आहेत. तुमचं मन आणि तुमचं चित्त आज शुद्ध होणार आहे. तुमचं शरीर शुद्ध होणार आहे. तिसरं म्हणजे रस्त्यात जे जे मंदिर भेटतील, त्या प्रत्येक मंदिरात दर्शन घ्यायचं आहे. कारण त्या प्रत्येक मंदिराची जी कॉस्मिक एनर्जी आहे, ती आपला होरा क्लीन करते. आपल्यामध्ये शुद्धता येते. जशी आगीची धग जवळ गेल्यावर लागते, लांब उभे राहिल्यावर नाही, तसंच मंदिराच्या बाहेरून दर्शन घेतलं, तर मंदिरातील कॉस्मिक एनर्जीचा लाभ मिळणार नाही. काही लोकं उन्हाचा त्रास होऊ नये, म्हणून रात्रीच परिक्रमा सुरू करतात. मंदिरं बंद असतात. देव झोपलेले असतात, त्यामुळे कॉस्मिक एनर्जी मिळत नाही. साधारणपणे २२ ते २४ मंदिर या वाटेत आहेत. कांबळे सरांच्या मते, हे सर्व झाल्यानंतर तुम्ही घरी गेल्यावर ज्यावेळी साधना कराल, तेव्हा तुमच्या लक्षात येईल की आपण साधनेमध्ये एक पायरी वर चढलो आहोत. आजचं जे फळ आहे, ते तुम्हाला साधनेमध्ये एक पायरी वर घेऊन जाईल. तुमची बुद्धी आणि मन शुद्ध होईल. पोटात गेलेलं जल तुमचं जलचक्र सक्रिय करेल. आणि नर्मदामाई वारंवार तुम्हाला परिक्रमेची आठवण करून देईल. तुम्हाला बोलवत राहील. अशाच रीतीने आम्ही परिक्रमा पूर्ण केली. पुन्हा सरांकडे दुपारी एकच्या दरम्यान पोहोचलो. वाटेत जे जे मंदिर भेटले, त्या प्रत्येक मंदिरात दर्शन घेऊन थोड्यावेळ बसलो. आनंद घेतला. प्रत्येक मंदिरात प्रसादाची सोय आहेच. काही मंदिरात वॉशरूम आहेत. आपण सोबत खाण्याचे काहीही सामान न घेताही ही परिक्रमा पूर्ण करू शकतो, हे लक्षात आले. रस्त्याने ताक, लस्सी प्यायला मिळत गेले. एकादशी असल्यामुळे वेफर्स, चिवडा असे उपवासाचे पदार्थ होते.

**सौ. मंगल किशोर पेटकर, संगमनेर**

पॅनल देणे आहे

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन ................ 05
सेल्सगर्ल............... 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर....................... 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# बिहारमध्ये भाजपच्या पहिल्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी



नवी मुंबई (वृत्तसंस्था)

बिहारच्या राजकारणात मोठी घडामोड घडत सम्राट चौधरी यांनी राज्याचे २४ वे मुख्यमंत्री म्हणून आज बुधवार १५ एप्रिल रोजी पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली. सय्यद अता हसनैन यांनी पाटणा येथील लोक भवनात त्यांना शपथ दिली. त्यांच्या नियुक्तीमुळे बिहारमध्ये नव्या राजकीय पर्वाची सुरुवात झाल्याची चर्चा आहे.

सम्राट चौधरी हे भारतीय जनता पक्षाचे पहिले मुख्यमंत्री ठरले असून एनडीए सरकारमध्ये जेडीयू कोट्यातून विजय चौधरी आणि विजेंद्र प्रसाद यादव यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. १६ नोव्हेंबर १९६८ रोजी मुंगेर जिल्ह्यात जन्मलेल्या सम्राट चौधरी यांचा राजकीय वारसा त्यांच्या कुटुंबातूनच आला. त्यांचे वडील शकुनी चौधरी हे देखील राजकारणात सक्रिय होते. शिक्षणानंतर त्यांनी १९९० मध्ये सक्रिय राजकारणात प्रवेश केला. सम्राट चौधरी यांनी १९९९ मध्ये राबडी देवी यांच्या सरकारमध्ये कृषी मंत्री म्हणून काम पाहिले. त्यांनी विविध महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी सांभाळत आपली ओळख मजबूत केली. २०१४ मध्ये जितन राम मांझी यांच्या मंत्रिमंडळातही त्यांनी नगरविकास आणि गृहनिर्माण मंत्री म्हणून काम केले.

# एलसीबीची आठवड्यात चौथी मोठी कारवाई

## ९५० किलो गोमांस जप्त, स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरात सुरू असलेल्या अवैध कत्तल खान्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) आक्रमक मोहीम राबवत सोमवारी आणखी एक मोठी कारवाई केली. या धाडीत तब्बल ९५० किलो गोमांस जप्त करण्यात आले असून, एकाच आठवड्यातील ही चौथी मोठी कारवाई ठरली आहे. सलग होत असलेल्या कारवायांमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

नगर येथून येणारे एलसीबीचे पथक वारंवार कारवाया करत असताना, स्थानिक संगमनेर पोलिसांना या प्रकारांची माहिती कशी लागत नाही? असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, गणेश लोंढे, विजय पवार, बाळासाहेब गुंजाळ, अमृत आढाव, योगेश कर्डीले आणि उत्तरेश्वर मोराळे यांच्या पथकाने ही धाड टाकली.

एलसीबीला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, संगमनेर शहरातील गल्ली क्रमांक ६, जमजम कॉलनी येथे एका पत्र्याच्या शेडमध्ये नवाज जावेद कुरेशी हा आपल्या साथीदारांसह गोवंशीय जनावरांची अवैध कत्तल करत असल्याचे उघड झाले. माहितीची खातरजमा होताच पथकाने तातडीने घटनास्थळी छापा टाकला.

पोलिसांची चाहूल लागताच आरोपींनी पळ काढला मात्र घटनास्थळी मोठ्या प्रमाणात मांस आढळून आले. तपासादरम्यान पोलिसांनी २ लाख ८५ हजार रुपये किमतीचे ९५० किलो गोमांस, तसेच कत्तलीसाठी वापरली जाणारी हत्यारे - चाकू, काणस आणि इलेक्ट्रॉनिक वजन काटा असा एकूण २ लाख ८७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी नवाज जावेद कुरेशी, समद जावेद आणि नावेद जावेद कुरेशी (रा. भारतनगर, संगमनेर) या फरार आरोपींविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, ३२५, ३(५) तसेच प्राणी संरक्षण कायद्यांतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



विशेष म्हणजे, एकाच आठवड्यात एलसीबीने केलेल्या चार वेगवेगळ्या कारवायांमध्ये एकूण २० लाख ७१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यावरून शहरात अवैध कत्तलखान्यांचे जाळे किती मोठ्या प्रमाणात पसरले आहे, हे स्पष्ट होत आहे. दरम्यान, एलसीबीचे पथक बाहेरून येऊन शहरातील अवैध धंद्यांवर प्रभावी कारवाई करत असताना, स्थानिक पोलिस मात्र निष्क्रिय का? असा सवाल आता सर्वसामान्य नागरिक, सामाजिक संघटना आणि व्यापारी वर्गातून जोर धरू लागला आहे.

सलग चार कारवायांनंतर संगमनेर शहर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून ते जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत का? अशीही चर्चा रंगू लागली आहे. अवैध कत्तल खान्यांविरोधातील ही मोहीम आता आणखी तीव्र होणार का, आणि स्थानिक पोलीस यावर काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शिवसेनेत मोठा बदल

## आदित्य ठाकरेंना कार्याध्यक्षपदाची संधी ?



मुंबई (वृत्तसंस्था)

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात मोठे संघटनात्मक बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील या पक्षात युवा नेते आदित्य ठाकरे यांना लवकरच महत्त्वाची जबाबदारी दिली जाऊ शकते. आदित्य ठाकरे यांची पक्षाच्या कार्याध्यक्ष पदावर नियुक्ती होण्याची शक्यता असून, यासंदर्भात पक्षात जोरदार चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे हे कार्याध्यक्ष पद शिवसेनेत प्रथम २००३ साली बाळासाहेब ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यासाठी निर्माण केले होते. त्या पदावरून उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या संघटनात्मक कामकाजात महत्त्वाची भूमिका निभावली होती. आता त्याच धर्तीवर आदित्य ठाकरे यांची नियुक्ती करण्याचा विचार सुरू असल्याचे बोलले जात आहे. पक्षाच्या आगामी बैठकीत याबाबत प्रस्ताव मांडला जाऊ शकतो, अशी माहिती समोर येत आहे. शिवसेना पक्षाचा वर्धापन दिन जवळ येत असताना या निर्णयाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. याच दिवशी आदित्य ठाकरे यांची कार्याध्यक्ष म्हणून घोषणा केली जाऊ शकते, अशीही शक्यता वर्तवली जात आहे. पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत या निर्णयावर अंतिम शिक्कामोर्तब होण्याची शक्यता असून, त्यानंतर उद्धव ठाकरे अधिकृत घोषणा करू शकतात.

# दत्तधामच्या भोंदूविषयी जनतेच्या...

पान १ वरून -

याचे व्हिडिओ सोशल मीडियावर सर्वत्र फिरत आहे. एखाद्या महिलेचे हात पाय सातत्याने दुखत असेल तरीही ओम शीव.. मंत्र म्हणून बाबा त्यांना बरे करताना या व्हिडिओमध्ये दिसत आहे. एखाद्या व्यक्तीची दारू सोडवायची असेल तर सदर बाबा त्याच्या शरीराची, रक्ताची कुठलीही तपासणी न करता गोळ्या दिल्या जातात. मात्र अशा प्रकारचा अघोरी उपचार एखाद्याच्या जीवावर बेतण्याची शक्यता आहे. हा सर्व प्रकार खुलेआम सुरू असताना, अनेक जण याबाबत भीती व्यक्त करीत असताना, अंधश्रद्धा निर्मूलन समितीने देखील याबाबत तक्रार नोंदविली असताना देखील पोलीस प्रशासनाकडून या बाबांवर कुठलीही कारवाई होत नाही. याचे मोठे आश्चर्य वाटते.

पोलिस असा दावा करीत आहे की आमच्याकडे याबाबत कुठलीही तक्रार नाही मग आम्ही तपास कसा करायचा. वास्तविक महाराष्ट्रात जादूटोणा विरोधी प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आहे. या कायद्यानुसार पोलीस स्वतः हून दखल घेऊ शकतात. परंतु पोलिसांमध्येच या बाबाचे भक्त असून शकतात त्यामुळे पोलिस दखल घेत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

नाशिकचा खरात बाबा स्त्रीलंपट निघाला त्यामुळे तो फसला. येथे सध्या तरी तसा हा बाबा ज्या प्रकारे बोगस दावे करतो, अंगारा धूपारा देतो, गोळ्या देतो, मंतर मारतो , आर्थिक लूट करतो, मर्सिडीजमध्ये फिरतो हा सर्व गोरख धंदा तो खुलेआम करतो. यावर कुणी अंकुश लागणार की नाही असा प्रश्न आहे. नाहीतर खरात, आसाराम, रामरहिम आशा बाबांसारखा प्रताप केल्यानंतर प्रशासन जागे होणार का असा प्रश्न पडतो.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता -
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग
• मधुमेह व हृदयरोग
• दमा व श्वसनाचे विकार
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार
• जनरल सर्जरी
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया
• किडनी विकार
• मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• सर्पदंश व विषबाधा
• बालरोग चिकित्सा विभाग
• प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन
मान्सुन ऑफर
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25